MHYA100018962025

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०६२/२०२५</u>**
सरकार वि. नंदु व ईतर
**नि. क्र. ११ वर**

**<u>न्या य नि र्ण य</u>**
**( दि. १० जुन, २०२६ रोजी घोषीत )**

अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस.बी. जगताप व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.ए. सरोदे यांचा युक्तीवाद ऐकला.

२. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ समोर आले. त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे दिलेली आहे.

| | *<u>मुद्दे</u>* | *<u>निष्कर्ष</u>* |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि. ०४/०९/२०२५ रोजी मौजे कंरजी, ता. केळापुर, जि. यवतमाळ येथील दोन्ही आरोपीं हे १०० लिटर क्षमतेच्या एका स्टील ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर मोहफुल सडवा, २० लिटर क्षमतेच्या एका प्लॉस्टीक कॅनमध्ये अंदाजे २० लिटर हातभट्टी दारु कॅनसह तसेच एक घमेले व प्लॉस्टीक ड्रम बाळगून असल्याचे मिळुन आला व त्याव्दारे महा. दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ब), (क), (ड), (ई) व (फ) अन्वये गुन्हा केला आहे काय **?** | .. नकारार्थी. |
| २) | काय आदेश ? | .. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

३. अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. महेश विजय धाबेकर (सा.क्र.१) यांची नि.क्र.११ प्रमाणे साक्ष नोंदविली. बचाव पक्षातर्फे पुरावा सादर करण्यात आला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u> :-**

४. मुद्दा क्रमाक १ सिद्ध करण्याकमी अभियोग पक्ष्यातर्फे महेश विजय धाबेकर (सा.क्र.१) यांना नि.क्र. ११ नुसार तपासण्यात आले. त्याच्या साक्षीचे अवलोकन केले. त्यांनी साक्षीत सांगितले की, दि. ०४/०९/२०२५ रोजी त्याच्या समोर पंचनामा झाल्याचे नाकारले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत आरोपींचे त्याब्यातुन १०० लिटर क्षमतेच्या एका स्टील ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर मोहफुल सडवा, २० लिटर क्षमतेच्या एका प्लॉस्टीक कॅनमध्ये अंदाजे २० लिटर हातभट्टी दारु कॅनसह तसेच एक घमेले व प्लॉस्टीक ड्रम जप्त केल्याचे नकारले आहे. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून सडवा मोहामाच व हातभट्टी दारु जप्त केली हि बाब सिद्ध होऊ शकली नाही.

५. भियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणामध्ये रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर १०० लिटर क्षमतेच्या एका स्टील ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर मोहफुल सडवा, २० लिटर क्षमतेच्या एका प्लॉस्टीक कॅनमध्ये अंदाजे २० लिटर हातभट्टी दारु कॅनसह तसेच एक घमेले व प्लॉस्टीक ड्रम आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेली दारु आहे ही बाब सिध्द झालेली नाही. अभियोग पक्ष हे आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यामध्ये अपयशी ठरले. खटल्यातील हे १०० लिटर क्षमतेच्या एका स्टील ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर मोहफुल सडवा, २० लिटर क्षमतेच्या एका प्लॉस्टीक कॅनमध्ये अंदाजे २० लिटर हातभट्टी दारु हा नाशवंत असल्याने घटनास्थळीच नाश करण्यात आला आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आ दे श</u>**

१) आरोपी क्र. **१ नंदु सकलाल राठोड, क्र. २ आनंद वैजु रामपुर दोन्ही राहणार – करंजी, ता. केळापुर, जि. यवतमाळ** ह्यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ब), (क), (ड), (ई) व (फ) मधुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन पत्र व बंध पत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ अन्वये रु. १५,०००/- चे बंध पत्र सादर करावे.

न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

स्वा/-

दिनांक :- **१० जुन, २०२६.**

**(सायमा.एन.ए.एस.शेख)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. २
**केळापुर**